University of Mumbai

संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ
मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०००९८

----------------------------------------------------------------------------------------------------------------

**परिपत्रक**

No. Exam/DBOEE/ICC/2020-21/03

**विषयः— द्वितीय सत्र २०२० (हिवाळी) परीक्षेचे २५ टक्के परीक्षा शुल्क महाविद्यालयांना देण्याबाबत.**

**संदर्भः— No. Exam/DBOEE/ICC/2020-21/ 15, दिनांक १८/ ११/२०२०**

उपरोक्त नमूद विषयाच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० मधील **द्वितीय सत्र २०२० (हिवाळी)** परीक्षेच्या आयोजना बाबत परीपत्रक क्र. Exam/DBOEE/ICC/2020-21- 15, दि. १८/११/२०२० नुसार महाविद्यालयांना ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत सुचित केलेले होते, त्यानुसार महाविद्यालयांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेताना सदर परीक्षांचे आयोजन करण्यासाठी लागणारी यंत्रणा, प्रक्रिया व साधन सामुग्री, इत्यादी कामांचे मानधन यासाठी येणा—या खर्चाची प्रतीपुर्ती करण्यासाठी **द्वितीय सत्र २०२० (हिवाळी)** परीक्षांसाठी आकारण्यात आलेल्या परीक्षा शुल्कापैकी २५ टक्के परीक्षा शुल्क महाविद्यालयांना देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतलेला आहे. त्याप्रमाणे उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाला अनुसरुन २५ टक्के शुल्क परतावा करण्यास सुलभता येण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी **द्वितीय सत्र २०२० (हिवाळी)** परीक्षासांठी विद्यापीठात भरलेल्या परीक्षा शुल्का संबंधीची माहिती https://forms.gle/XT93QGnZQU1a7p6w5 या google form लिंकवर खालील प्रमाणे पाठवावी.

**१) मॅनडेट प्रत □डिजीटल युनिव्हर्सिटी पोर्टल)**
**२) सबमिशन रिपोर्ट प्रत □मुंबई युनिव्हर्सिटी पोर्टल)**
**३□शुल्क ऑनलाईन जमा केलेली पावती**
**४) बॅक NEFT/RTGS Form**
**५) बॅक खात्याच्या धनादेशाची फोटो प्रत**

तसेच वरील सर्व माहितींची पुर्तता करुन **सदर दस्ताऐवजांच्या छायांकित प्रतिंचा एक संच (Hard Copies)** दिनांक ३१/०५/२०२१ पर्यत खोली क्र. ४५, दुसरा मजला, महात्मा फुले भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पू) ४०० ०९८ येथे सादर करावेत.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४/०५/२०२१

डॉ. विनोद पाटील
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रती :
१. मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
२. उपकुलसचिव, निकाल कक्ष, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई—९८
३. उपकुलसचिव, वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई—९८
४. मुख्य लेखापाल, वित्त व लेखा विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई—३२
५. स्वीय सहाय्यक: १) कुलगुरू २) प्र—कुलगुरू ३) कुलसचिव